गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन समारंभ

ता. 06 ऑगस्ट 2019

15 श्रावण 1941

देशातील इतर भागाप्रमाणे गोव्यात 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यात येणार आहे. पणजीतील जुन्या सचिवालयासमोर राज्य पातळीवरील कार्यक्रम संपन्न होणार असून गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत राष्ट्रीय तिरंगा फडकावतील, मानवंदना स्वीकारतील, संचलनाची पाहणी करतील आणि राज्यांतील लोकांसमोर भाषण करतील. यावेळी मुख्यमंत्र्यांच्याहस्ते विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

सदर कार्यक्रमास सभापती श्री. राजेश पाटणेकर, कॅबिनेटमंत्री, विरोधी पक्षनेते श्री. दिगंबर कामत, उच्च न्यायालयाचे न्यायाधिश, अॅड. जनरल आणि इतर मान्यवर उपस्थित राहतील.

कार्यक्रमाच्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांचे आगमन झाल्यावर महसूलमंत्री श्रीमती जेनिफर मोंन्सेरात, मुख्य सचिव श्री. परिमल राय आणि पोलीस महासंचालक श्री. प्रणव नंदा त्यांचे स्वागत करतील.

स्वातंत्र्यदिनानिमत्ताने 14 आणि 15 ऑगस्ट रोजी राजभवन, जुनी सचिवालय इमारत, लेखा संचालनालय इमारत आणि पर्वरीतील नवीन सचिवालयात रोषणाई करण्यात येईल.

क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने 15 ऑगस्ट रोजी मुले आणि नागरिकांचा सहभाग असलेल्या प्रभात फेरीचे आयोजन केले आहे. त्याचप्रमाणे मुलांसाठी व नागरिकांसाठी सायकल आणि मॅटाथॉन रेसचेही आयोजन केले आहे. बालभवनचे विद्यार्थी यावेळी देशभक्तीपर गीते सादर करतील.

स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यासाठी जिल्हा आणि तालुका पातळीवरही ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मडगांव येथील जिल्हा पातळीवरील कार्यक्रमात जलसंसाधनमंत्री श्री. फिलीप नेरी रॉड्रीगीज सकाळी 9.15 वाजता ध्वजारोहण करतील तर फोंडा येथील कार्यक्रमात कला व संस्कृतीमंत्री श्री. गोविंद गावडे राष्ट्रीय तिरंगा फडकावतील.

राज्यात तालूका पातळीवर म्हापसा येथे होणाऱ्या स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री श्री. मायकल लोबो, डिचोली येथे होणाऱ्या कार्यक्रमात आमदार श्री. प्रवीण झांट्ये, काणकोण येथे होणाऱ्या कार्यक्रमात उपसभापती श्री. इजिदोर फर्नांडिस, वास्को येथे होणाऱ्या कार्यक्रमात वाहतूक मंत्री श्री. माविन गुदिन्हो, पेडणे येथे होणाऱ्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. मनोहर आजगांवकर, केपे येथे होणाऱ्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. चंद्रकांत कवळेकर, धारबांदोडा येथे होणाऱ्या कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. दिपक पाऊसकर, सांगे येथे होणाऱ्या

कार्यक्रमात वीज मंत्री श्री. निलेश काब्राल तर वाळपई येथे होणाऱ्या कार्यक्रमात सत्तरीचे उपजिल्हाधिकारी राष्ट्रीय तिरंगा फडकवतील.

तद्नंतर गोव्याच्या राज्यपाल डॉ. श्रीमती मृदूला सिन्हा यांनी 15 ऑगस्ट रोजी संध्या 5.15 वाजता दोनापावल येथील राजभवनात स्वागत समारंभाचे आयोजन केले आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत इतर स्वातंत्र्यसैनिक व मान्यवरांसमवेत सकाळी 11.30 वाजता पत्रादेवी येथील हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्रे वाहतील.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/437

DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA